**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४७/२०१४ मधील निशाणी क्र. ७८ वरील आदेश</u>**

( रघुनाथ म्हसणे व इतर वि. कारभारी म्हसणे व इतर)

वादीने सदरचा अर्ज नि. १ वरील दि. ०३/१२/२०२५ रोजीचा आदेश रद्द होणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज व प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** वादीने सदरचा दावा घोषणा व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा १० वर्षापेक्षा जास्त जुना आहे. वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि. ५९ वर दि. १५/०६/२०१७ रोजी दाखल केला आहे. वादी दि. ०९/०४/२०२५ रोजी पासुन गैरहजर राहील्यामूळे दि. ०३/१२/२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे प्रस्तुत दावा खारीज करण्यात आला. सबब, वादीने प्रस्तुत अर्ज सदर आदेश रद्द होणेकरीता दाखल केला आहे.

**०४.** रोजनाम्यावरुन असे दिसून येते की वादी नियमितपणे हजर न राहील्यामूळे दावा प्रलंबित आहे. तसेच दि.०३/१२/२०२५ रोजी दावा खारीज करण्याकरीता ठेवल्यानंतर वादी दि. ०८/०१/२०२६ रोजी देखिल गैरहजर होता. तदनंतर वादी व वादीचे वकील दाव्याच्या कामकाजासाठी प्रत्येक तारखेला हजर आहेत. त्यामूळे वादीला दावा चालविण्याची अजुन एक संधी देणे न्यायोचित राहील. सबब, प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे मला योग्य वाटते. परीणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.१ वरील दि.०३/१२/२०२५ रोजीचा आदेश वादीने प्रतिवादीस रक्कम रु. २००/— दिल्यानंतर रद्द समजण्यात येईल.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.04.08 16:26:00 +0530

स्थळ:— इगतपुरी
दिनांक:— ०८/०४/२०२६

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.